महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | Rs.2/- | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे

मंगळवार ❖ २४ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १७९ ❖ पाने - ४ | RNI NO : MAHMAR/2016/72091 | Postal Reg. No. THC/256/2022-2024

# शिक्षण मंत्री ‘ॲक्शन मोड’ मध्ये

## ग्रामीण भागातील शाळेत दिसणार शालेय शिक्षण मंत्री



दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार आणि खातेवाटप पार पडले. नागपुरातील विधिमंडळ अधिवेशन पार पडल्यानंतर आता सर्वच मंत्र्यांनी नव्या खात्याचा पदभार स्वीकारत कामाला सुरुवात केली आहे. त्यातच शालेय शिक्षण मंत्री पदाची जबाबदारी दादा भुसे यांच्याकडे आली आहे. पहिल्याच दिवशीपासून दादा भुसे यांनी कामाला सुरुवात केली आहे. शालेय शिक्षण खात्याचा पदभार घेत पहिल्याच दिवशी त्यांनी अचानक शाळांना भेटी दिल्या. यावेळी त्यांनी थेट शाळांमधील वर्गात जाऊन विद्यार्थी व शिक्षकांशी संवाद साधत अडचणी जाणून घेतल्या. नागपुरचे हिवाळी अधिवेशन पार पाडल्यानंतर शनिवारी रात्री उशिरा मंत्रीमंडळाचे खातेवाटप जाहीर क?ण्यात आले. त्यानंतर राज्यातील मंत्री मतदारसंघात पोहचले. त्यानंतर स्वागत स्वीकरून अनेक मंत्र्यांनी सोमवारी मंत्रालयात जाऊन पदभार घेतला. परंतु, शालेय शिक्षण मंत्रीपदाची जबाबदारी मिळालेले मंत्री दादा भुसे (ऊ्ँप्ले) यांनी थेट शाळांना भेटी दिल्या. मालेगाव तालुक्यातील शाळांमध्ये जाऊन त्यांनी विद्यार्थ्यांकडून वाचन करुन घेतले. यावेळी शिक्षकांच्या समस्या जाणून घेतल्या. शिवसेनेचे नेते तथा मंत्री दादा भुसे यांनी मालेगाव तालुक्यातील अनेक शाळांना अचानक दिल्या भेटी दिल्या. शालेय आरोग्य, आरोग्य तपासणी, विद्यार्थी पोषण आहार यांची माहिती घेतली. त्यासोबतच विद्यार्थी अन् शिक्षकांच्या अडचणी समाजावून घेतल्या. यावेळी त्यांनी शाळेतील सोयीसुविधांचा आढावा घेतला.

> **“ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांचे अतिशय जिव्हाळ्याचे शिक्षण खातं आहे. याबाबत त्यांनी मला कल्पनाही दिली होती. गरीबातील गरीब पाल्याला चांगलं आणि उत्तम शिक्षण देणे अपेक्षित आहे. मी आणि आम्ही मालेगावकर जीवाचे रान करून गरीबातील गरीब मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याच्या प्रयत्न करू. मंत्री पदाबाबत माझ्यापेक्षाही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना काय वाटतं, ते महत्त्वाचे आहे. या विषयात अनेक आव्हाने देखील आहेत. विद्यार्थी, पालक, संस्था यांना विश्वासात घेऊन काम करू. अनेक गावांनी शाळा उच्चाटनासाठी चांगले काम केले आहेत. त्यांना विश्वासात घेऊन काम करू. तसेच पालकमंत्री पदासाठी मुख्यमंत्री आणि दोघेही उपमुख्यमंत्री यावरती लवकरच निर्णय घेतील. तर नाशिक पालकमंत्री पद मला मिळालं यासाठी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री निर्णय घेतील.**
>
> **- दादा भुसे, शालेय शिक्षण मंत्री**



# मंत्र्यांना शासकीय बंगल्याचे वाटप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यात महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तारानंतर अखेर ८ दिवसांनी मंत्र्यांचे खातेवाटपही पार पडले. त्यामध्ये, अनेक नेत्यांच्या खात्यांची खांदेपालट करण्यात आल्याचं पाहायला मिळालं. तर, काही नेत्यांना पहिल्यांदा मंत्रि?पदाची संधी मिळाल्यानंतर महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी देखील देण्यात आली आहे. मंत्रिमंडळ खातेवाटपानंतर आता मंत्र्यांना मंत्रालयातील दालनाचे आणि दालनाच्या पाठोपाठ सरकारी बंगल्यांचेही वाटप करण्यात आले. त्यामध्ये, विधानपरिषद सभापती राम शिंदे यांना ज्ञानेश्वरी हा बंगला देण्यात आला असून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना शिवगिरी बंगल्याची चावी मिळाली आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना रामटेक बंगला देण्यात आला आहे.

महायुतीच्या ३१ मंत्र्यांना बंगल्याचं वाटप करण्यात आलं असून त्याची यादीही समोर आली आहे. त्यानुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंना रामटेक, राधाकृष्ण विखे पाटलांना रॉयलस्टोन, पंकजा मुंडेंना पर्णकुटी, शंभूराज देसाईंना मेघदूत तर गणेश नाईकांना पावनगड बंगला देण्यात आला आहे. धनंजय मुंडेंना सातपुडा, चंद्रकांत पाटील यांना सिंहगड बंगला देण्यात आला आहे. दरम्यान, आधी मंत्रीपदावरुन, नंतर खातेवाटपावरुन काही नेत्यांमध्ये नराजी पाहायला मिळाली. मात्र, आता बंगले वाटपावरुनही मंत्र्यांमध्ये नाराजी पाहायला मिळते की काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. मात्र, गत बहुतांश मंत्र्यांना त्यांचेच बंगले अलोट करण्यात आल्याचं यादीवरुन दिसून येते.

### कोणत्या मंत्र्यांस कोणता बंगला

महायुती सरकारच्या मंत्र्यांना खातेवाटप केल्यानंतर आता बंगल्यांचं देखील वाटप करण्यात आलं आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बाबनकुळे यांना रामटेक हा बंगला देण्यात आलेला आहे. तर पंकजा मुंडे यांना पर्णकुटी हा बंगला देण्यात आला आहे. नवीन सरकारमध्ये चंद्रशेखर बाबनकुळे यांच्याकडे महसूल खाते याची जबाबदारी देण्यात आलेली आहे. तर पंकजा मुंडे या पर्यावरण मंत्री आहेत. यासोबत राधाकृष्ण विखे पाटील यांना रॉयल स्टोन हा बंगला देण्यात आलेला आहे. शंभूराज देसाई यांना मेघदूत तर गणेश नाईक यांना पावनगड हा बंगला देण्यात आला असून हसन मुश्रीफ यांना विशाळगड, चंद्रकांत पाटील यांना ब एक सिंहगड, गिरीश महाजन यांना सेवा सदन, गुलाबराव पाटील यांना जेतवन हा बंगला देण्यात आला आहे. जयकुमार रावल यांना चित्रकूट तर अतुल सावे यांना शिवगड हा बंगला देण्यात आलेला आहे. आशिष शेलार यांना रत्नसिंधू, दत्तात्रय भरणे यांना सिद्धगड, तर अदिती तटकरे यांना प्रतापगड, शिवेंद्र राजे भोसले यांना पन्हाळगड, माणिकराव कोकाटे यांना अंबर, जयकुमार गोरे यांना प्रचितीगड, नरहरी झिरवाळ यांना सुरुची, संजय सावकार यांना अंबर ३२ तर संजय शिरसाट यांना अंबर ३८ हा बंगला देण्यात आला आहे. उदय सामंतांना मुक्तागिरी तर धनंजय मुंडे यांना सातपुडा हा बंगला देण्यात आला आहे. संजय राठोड यांना शिवनेरी बंगला, गणेश नाईक यांना पावनगड, दादा भुसे यांना ब तीन जंजिरा हा बंगला देण्यात आला आहे. तर दालनापाठोपाठ आता मंत्र्यांना बंगल्यांचे देखील वाटप करण्यात आला आहे.



# कल्याण मुरबाड रस्ता बाधितांना मोबदला द्या

## आ. किसन कथोरे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ मुरबाड

कल्याण मुरबाड रस्ता रुंदीकरण काम सुरु आहे. हे काम ज्या जलद गतीत सुरु आहे. त्या गतीत बाधित शेतकऱ्यांना मोबदला देण्यासाठी यत्रनेने काम करावे व शेतकऱ्यांना त्वरित मोबदला द्यावा अशी मागणी आमदार किसन कथोरे यांनी केली आहे. या रस्ता रुंदीकरणात भूमिपुत्र शेतकरी भूमिहीन होणार आहे. रस्त्याची गरज आहे. मात्र ज्या शेतकऱ्याच्या जमिनी व घरे, दुकानें बाधित झालेली आहेत. त्या सर्वांना न्याय मिळवून देण्यासाठी माझी भूमिका आहे. त्या नुसार उप विभागीय अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग विभाग या अधिकाऱ्यांना व ठेकावदाराला स्पष्ट सूचना केल्या आहेत.

या रस्त्यात ज्या शेतकरी बाधवांची जमीन गेली आहे. त्या शेतकरी बांधवना मोबदल्यासाठी चकरा मारण्यासाठी भाग पाडू नका. या साठी अधिकारी शेतकरी यांना एकत्र करून कोणत ही राजकारण न करता शेतकरी व बाधित घटक महत्वाचा मानून प्रयत्न करणार असल्याचे श्री कथोरे यांनी सांगितले.

कल्याण मुरबाड रस्ता चौपदरीकरण काम जोरात सुरु आहे. ठेकेदार मनमांनी करत आपले काम पूर्ण करण्यासाठी रात्रीचा दिवस करत काम करत आहे. भू संपादन व बाधित शेतकरयांना मोबदला कधी मिळणार या बाबत शेतकरी सतप्त झाला आहे.





# जिल्हा परिषदेच्या क्रीडा स्पर्धांचा निधी गेला कुठे?

कल्याण □ प्रतिनिधी

दिनांक २३ रोजी कल्याण तालुक्याच्या जिल्हा परिषद शाळांच्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा आर्या गुरुकुल शाळा नांदिवली येथे संपन्न झाल्या. यामध्ये खडवली, गुरवली , गोवेली ,सोनार पाडा , खोणी ,दहिसर या केंद्रातील कबड्डी, खो-खो, लंगडी ,धावणे, रीले, लांब उडी ,संगीत खुर्ची ,लेझीम यामध्ये केंद्रात प्रथम आलेले स्पर्धक तालुकास्तरावर सहभागी झाले .स्पर्धा आयोजकानी प्राप्त खर्च केला की नाही याबाबत उलट सुलट चर्चा सुरु होती या स्पर्धांकरिता जिल्हा शिक्षण विभाग खर्च करण्यासाठी ठराविक निधी देते. ३५० ते ४०० विद्यार्थ्यांकरिता नाश्त्याची, जेवणाची कोणतीही सोय नव्हती. शिक्षकांकरिता कुपन देऊन निष्कृष्ट दर्जाचे दर्जाचे चहा, पोहे व जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. त्यातही अधिकाऱ्यांनी या खाजगी शाळेलाच ही सर्व व्यवस्था सांगितली असावी असा दाट संशय व्यक्त होत आहे. मैदानावर मंडप, खुर्च्या, माईक ही सर्व व्यवस्था स्वतः या शाळेनेच केली असावी कसा खर्च केला याचा जाब कोणी विचारणार आहे का?

# माजी क्रिकेटपटू विनोद कांबळी यांची प्रकृती खालावली

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

टीम इंडियाचे माजी फलंदाज विनोद कांबळी यांची प्रकृती अचानक बिघडली आहे. शनिवारी (२१ डिसेंबर) रात्री उशिरा त्यांना ठाण्यातील आकृती रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या डॉक्टर त्यांची काळजी घेत आहेत. त्याच्या सर्व आवश्यक चाचण्या केल्या जात आहेत. सध्या ते ठिक असले तरी त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे मीडिया रिपोर्ट्समध्ये म्हटले जात आहे. याचबरोबर विनोद कांबळींना रूग्णालयात दाखल केल्याचे फोटोही सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. तर काही चाहत्यांनी व्हीडिओदेखील काढला आहे.

ठाण्यातील कशेळी येथील आकृती रुग्णालयात भारतीय क्रिकेट संघाचे माजी खेळाडू विनोद कांबळी यांना उपचारासाठी दाखल केले आहे. दोन दिवसांपूर्वी चक्कर येऊन ते पडले होते त्यानंतर तपासणी केली असता त्यांना कावीळ व व्हायरल इन्फेक्शन असल्याचे समजले तसेच मेंदूला देखील थोड्याफार प्रमाणात सूज आल्याचे डॉक्टरांनी त्यावेळी सांगितले. त्यामुळे त्यांना गेले दोन दिवसापासून ॲडमिट करण्यात आले असून सध्या त्यांचे प्रकृती ठीक आहे अजून पाच ते सहा दिवसानंतर ते पूर्ववत होतील, असा अंदाज डॉक्टरांनी व्यक्त केला आहे.

हृदयविकाराबरोबरच कांबळी इतर समस्यांमधूनही जात आहे. यापूर्वीही त्यांची प्रकृती खालावली होती. आता पुन्हा एकदा त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त, कांबळीने त्याच्या मानसिक आरोग्य आणि मद्यपान यांच्या संघर्षांबद्दल खुलेपणाने सांगितले आहे, या दोन्ही गोष्टींचा परिणाम त्यांच्या तब्येतीवर दिसून आला आहे.

> **“ ‘डॉक्टर माझ्यासाठी देव आहेत, मरणाच्या दारातून मी आलो आहे, मी पुन्हा उभा राहील आणि पुन्हा लवकरच क्रिकेटच्या मैदानात दिसेल, मी अजून मेलो नाही,जिवंत आहे आणि मरणारही नाही, मी सचिन तेंडुलकर सोबत पुन्हा क्रिकेट खेळताना दिसेन, सचिन तेंडुलकरला देखील माझा हाच निरोप आहे,’**
>
> **- विनोद कांबळी**




जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7719814142
9130580111

# डोळखांब भागात बिबट्याने २२ बकऱ्या केल्या फस्त

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ शहापूर ग्रामीण प्रतिनिधी

शहापूर : तालुक्यातील डोळखांब परिसरातील गुंडा भागातील चिंचवाडी येथील भाऊ हंबीर, रामा हंबीर, नागो हंबीर या शेतकऱ्यांच्या २२ बकऱ्या बिबट्याने फस्त केल्या. चिंचवाडी येथील शेतकरी भाऊ हंबीर, रामा हंबीर यांच्या आजापर्वत परिसरातील जंगलात चरण्यासाठी नेलेल्या १४ बकऱ्या व नागो हंबीर या शेतकऱ्यांच्या आठ बकऱ्या रविवारी पहाटे बिबट्याने फस्त केल्या.

वन विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनीजागेवर जाऊन घटनेचा पंचनामा केला. या शेतकऱ्यांना तातडीची मदत व्हावी अशी मागणी येथील ग्रामस्थांनी वन विभागाकडे केली. परिसरात बिबट्याचा वावर असल्याने ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण पसरले. पशुधन (पाळीव प्राणी) गाय, म्हैस व बैल यांचा मृत्यू झाल्यास बाजार भाव किंमतीच्या ७५ टक्के किंवा चाळीस हजार वा यापैकी कमी असणारी रक्कम, मेंढी, बकरी व इतर पशुधन यांचा मृत्यू झाल्यास बाजार भाव किंमतीच्या ७५टक्के किंवा दहा हजार, तसेच गाय, म्हैस, बैल यांना कायम अपंगत्व आल्यास बाजार भाव किंमतीच्या ५०टक्के किंवा बारा हजार व पशुधन जखमी झाल्यास औषधोपचारासाठी येणारा खर्च म्हणून चार हजार प्रति जनावर आर्थिक मदत देण्याचे शासनाने आदेशात म्हटले आहे. शिवाय औषधोपचार शासकीय व जिल्हा परिषदेच्या पशु चिकित्सालयात करणेस प्राधान्य देण्याचेही शासन निर्णयात म्हटले आहे. वन्यप्राणी हल्ल्यात मृत झालेल्या व्यक्तींच्या वारसांना देय अर्थसहाय्याच्या रक्कमेपैकी तीन लाख देय असलेल्या व्यक्तीला तत्काळ धनादेश व उर्वरीत सात लाख रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत दरमहा व्याज देणाऱ्या संयुक्त खात्यात ठेव रक्कम(एफडी)म्हणून जमा केली जाते.



# खरोशी शाळेचे विविध स्पर्धेत घवघवीत यश





**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी)**

दि.२४ : रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती पेण यांच्या संयुक्त विद्यमाने खरोशी-केंद्रातर्फे आयोजित क्रीडा व व्यक्तीमत्त्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सुयश मिळवून १४ बक्षीसे जिंकून केंद्रात अव्वल स्थान पटकावला. प्रभाकर पाटील फार्म हाऊस वळक येथे केंद्रप्रमुख प्रफुल्ल सुखचैन यांच्या उत्तम नियोजनात सर्व खरोशी केंद्रातील शिक्षकांच्या सहकार्याने सदर स्पर्धेत बेचकी प्रकार, लंगडी दोरी उडी, लगोरी, पारंपारिक नृत्य व समूहगीत गायन शिल्पकला पथनाट्य यांचा समावेश होता. यामध्ये खरोशी शाळेने बेचकीने नेम धरणे शिल्प कला समूहगान पारंपारिक नृत्य, लगोरी, पथनाट्य शून्य कचरा व्यवस्थापन या विविध स्पर्धा मध्ये लहान व मोठ्या गटात प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावून घवघवीत यश प्राप्त केले.प्रारंभी क्रीडा ज्योत पेटवून व सरस्वती मातेच्या प्रतिमेस पुष्पमाला घालून स्पर्धेचे दीप प्रज्वलन रायगड जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी सुनिल भोपळे प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. बेलवडे सरपंच ग्रामपंचायत सदस्या, वळक सरपंच, बळवली सरपंच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य व पालक विद्यार्थी उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यास केंद्रप्रमुख व केंद्रातील शिक्षकांनी सहकार्य केले. खरोशी शाळेने आतापर्यंत आदर्श उत्कृष्ट शाळा प्रथम क्रमांक मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा तालुकास्तरीय व्दितीय क्रमांक , आदर्श शाळा पुरस्कार प्राप्तझाले असून शाळेची उत्तम प्रगती करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक किशोर म्हात्रे, सहकारी शिक्षक सदानंद पाटील सौ. अदिती चेऊलकर उदय म्हात्रे , राजेंद्र शिंदे, ज्योती एकशिंगे पूजा तोगडे यांनी मार्गदर्शक व व्यवस्थापक यांची भूमिका बजावली. या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गणपत पाटील उपाध्यक्षा सौ. प्रिती सोपान पाटील व सदस्य सरपंच सौ.रुपाली पाटील उपसरपंच प्रणाली घरत यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले.

# बेवारस वाहनांच्या विळख्यातून उल्हासनगर मोकळं होण्याच्या मार्गावर...



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ उल्हासनगर(प्रतिनिधी)**

दि.२४ : अनेक अपघातग्रस्त व निकामी झालेले वाहने ही वाहन चालक-मालक हे रस्त्यावर वर्षानुवर्ष धुळ खाण्यासाठी सोडून देतात. ज्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना आणि रहदारीस खोळबा निर्माण होतो . महानगरपालिकेने अशा बेवारस वाहनांवर धडक कारवाईला सुरुवात केली आहे. त्यामुळे आता उल्हास नगरातील मुख्य रस्ते बेवारस वाहनांच्या कब्ज्यातुन मोकळा श्वास घेत आहे. रस्त्यांवर पडून असलेल्या या बेवारस वाहनांमुळे रस्त्यांचे विद्रुपीकरण झाल्याचे आणि त्यामुळे वाहतूक कोंडी होत असल्याचे महानगरपालिका आयुक्त विकास ढाकणे यांनी केलेल्या पाहणीत समोर आले होते. ही वाहने किती त्याचे सर्व्हेक्षण करून त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश विकास ढाकणे यांनी दिले होते. आयुक्तांच्या आदेशा ची तात्काळ अंमलबजावणी करतांना अतिरिक्त आयुक्त किशोर गवस यांच्या मार्गदर्शनाखाली नोडल अधिकारी,सहायक आयुक्त गणेश शिंपी यांनी १ डिसेंबर पासून धडाकेबाज कारवाई सुरू केली आहे. मुख्य रस्त्यांवर ४९ बेवारस वाहनांवर कारवाई केली असल्याची माहिती शिंपी यांनी दिली.

त्यानंतर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश भामरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सदाशिव पाटील यांच्या उपस्थितीत गणेश शिंपी यांच्या टीमने सदरच्या वाहनांवर नियमाप्रमाणे नोटीस लाऊन वाहने हटविण्यासाठी वाहन मालकांना ताकीद दिली होती. अशाप्रकारे वाहनांवर नोटीस लावल्यानंतर एकूण वाहन मालकांनी त्यांची ३७ वाहने मुख्य रस्त्यांवरुन हटवली होती. तथापी नोटिसांची मुदत संपल्यावरही १२ वाहने जागीच पडून असल्याने आयुक्त विकास ढाकणे यांच्या आदेशानुसार व अतिरिक्त आयुक्त किशोर गवस यांच्या मार्गदर्शना खाली गणेश शिंपी यांनी वाहतूक पोलीसांसोबत संयुक्त कारवाई करुन ही १२ बेवारस वाहने जमा केलेली आहेत. यापुढे बेवारस वाहने उभी किंबहूना पडून दिसल्यास त्यांच्यावर कारवाई करण्याची मोहीम राबवली जाणार अशी माहिती गणेश शिंपी यांनी दिली.

# माळशेज घाटाला पर्याय म्हणून नाणेघाटातून मार्ग काढण्याची आवश्यकता

## मुरबाडकरांकडून होत आहे जोरदार मागणी


**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता मुरबाड(प्रतिनिधी)**


दि.२४ : १९७० च्या दशकात सुरू झालेला कल्याण अहमदनगर मार्ग जरी सध्या रुंदी करण्यामुळे चर्चेत असला तरी वैशाखरेच्या पठारानंतर माळशेज घाटातून ह्या रस्त्याचे चौपदरीकरण कसे करणार असा एक्स प्रश्न सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांना सतावणार आहे. यावर पर्याय म्हणून ऐतिहासिक नाणेघाटातून बोगदा काढून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जुन्नर या जन्म स्थलाकडून हा मार्ग काढावा अशी मागणी पुढे येऊ लागली आहे अडीच हजार वर्षांपूर्वी वैशाखरे गावाजवळून कल्याण पैठण असा व्यापारी मार्ग नाणेघाटातून होता. त्यामुळे हा पर्याय मार्ग काढल्यास सोयीचा होऊ शकतो अशी मागणी मुरबाड तालुक्यातील होऊ लागली आहे.

सध्या कल्याण अहमदनगर या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ या मार्गाचे सध्या शहाड ते पाचवा मैल मुरबाड अशा रस्त्याचे रुंदीकरण सुरू आहे.

सह्याद्रीच्या कुशीत विसावलेला माळशेज घाट मुंबई आणि उपनगरातील पर्यटकांना जरी खुणावत असला तरी घाट सुरू झाल्यापासून जवळपास १९७० पासून आज तगायत अनेक वाहनचालक व पर्यटक यांचा बळी गेलेला आहे मालशेज घाटातून पर्यायी मार्ग म्हणून बांधकाम खात्यातर्फे बोगदा काढण्याचे काम जरी प्रस्तावित असले तरी नाणेघाट हा सोयीचा आणि उत्तम मार्ग ठरू शकतो अडीच हजार वर्षांपूर्वी कल्याण मुरबाड वैशाखरे घाटघर जुन्नर पूर्वीचे जीर्णनगर पैठण असा व्यापारी मार्ग होता अडीच हजार वर्षांपूर्वीच्या पाऊलखुणा आजही नाणेघाटामध्ये शाबूत आहेत टोल नाक्याचा इतिहास याच नाणेघाटातून भारत वर्षाला मिळाला असा ऐतिहासिक वारसा सांगणाऱ्या नाणेघाटातून बोगदा काढून तो थेट जुन्नर या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मभूमीला जोडल्यास चांगला पर्याय ठरू शकतो शिवाय मालशेज घाट हा पर्यटकांसाठी वेगळ्या पर्याय राहू शकतो पर्यटकांचे आवडते ठिकाण म्हणून माळशेज घाटामध्ये पर्यटकांना चांगल्या सुविधा निर्माण करता येतील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ चे रुंदीकरण करताना मोठा अडथळा घाटात येऊ शकतो एकीकडे उंच सह्याद्री तर दुसरीकडे हजारो फूट दरीचे चित्र यातून तरी मार्ग कसा काढणार लाखो करोडो रुपयाचा विनाकारण निधी खर्च करण्यापेक्षा नाणेघाट हा माळशेज घाटाला पर्यायी मार्ग ठरू शकतो राज्याचे पर्यटन विभाग, सार्वजनिक बांधकाम खाते, स्थानिक आमदार, स्थानिक खासदार व राज्याचे मुख्यमंत्री यांनी याबाबत नक्की विचार करावा अशी चर्चा सध्या मुरबाड मधून होत आहे मधल्या काळामध्ये दाऱ्या घाटातून पर्याय रस्ता काढण्याचा खटाटोप सुरू होता तशाच स्वरूपाचा सर्वे सुद्धा करण्यात आला लाखो रुपये खर्च केल्यानंतर अजूनही हा विषय लाल फितीत अडकलेला आहे.

परंतु यावर सोयीचा मार्ग म्हणून नाणेघाट हा तर मार्ग निघू शकतो देशातील जम्मू काश्मीर सारख्या बर्फाळ प्रदेशातून केंद्र सरकारने रेल्वेसाठी बोगदे काढले कोकण रेल्वे अशक्य वाटत होती तिथे सुद्धा मार्ग काढण्यात आला दक्षिण भारताला जोडणारा कोकण रेल्वे प्रकल्प थेट विशाखापट्टणम असा दक्षिण भारताला जोडला गेला त्यामुळे आता भारताच्या इतिहासातील अमोल ठेवा असलेला व पर्यटकांना सदैव खुणवणारा नाणेघाट हा पर्यायी मार्ग नक्कीच होऊ शकतो. अशी मागणी मुरबाडकर करीत आहेत अपघाताची मालिका थांबवायची असेल तर नाणेघाट हाच उत्तम पर्याय असल्याचे मुरबाड मधल्या काही जाणकार नागरिकांनी आपली प्रतिक्रिया देताना सांगितले.





"अडीच हजार वर्षाचा इतिहास सांगणारा नाणेघाट हाच माळशेज घाटाला पर्यायी विना अपघाती मार्ग ठरू शकतो,, मराठीचा पहिला शिलालेख यास नाणेघाटात कोरला गेला पावसाळयामध्ये पर्यटकांना खूनवणारा माळशेज घाटा नंतरचा इतिहास प्रसिद्ध असा घाट नाणेघाट आहे राज्य व केंद्र सरकारने पर्यटनाच्या दृष्टीने माळशेज घाटाला जैसे ते ठेवून नाणेघाटातून पर्याय मार्ग काढावा हा उत्तम मार्ग असू शकतो माळशेज घाटातील आतापर्यंतची अपघातांची मालिका लक्षात घेता नाणेघाट हाच उत्तम पर्याय आहे .

**- रमेश नारायण घरत, सामाजिक कार्यकर्ते,करचोंडे/मुरबाड**

# फडके मैदानात कचऱ्याचे साम्राज्य

## कल्याणातील फडके मैदान लग्न, जत्रा यासाठी न देण्याची मोहन उगले यांनी केली होती आयुक्तांकडे मागणी



**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी)**

दि.२४ : कल्याण पश्चिमेतील वासुदेव बळवंत फडके मैदान या खेळाच्या मैदानात कोणत्याही लग्न, जत्रा यांना परवानगी देऊ नये अशी मागणी माजी नगरसेवक, शिवसेना उपशहर प्रमुख मोहन उगले यांनी पत्राद्वारे केडीएमसी आयुक्तांकडे केली होती. मात्र या मागणीनंतर देखील केडीएमसी प्रशासनाने फडके मैदान लग्नकार्यासाठी दिल्याने ही लग्नकार्य झाल्यानंतर मात्र मैदानात कचऱ्याचे साम्राज्य पसरल्याने मैदानात येणाऱ्या खेळाडुंनी आणि फेरफटका मारण्यासाठी येणाऱ्या नागरिकांनी नाराजी व्यक्त केली असल्याची माहिती उगले यांनी दिली.कल्याण डोंबिवली मनपाच्या फडके मैदानात लग्न, इतर समारंभ साजरे करणारे लोक संपूर्ण मैदान घाण करून ठेवतात. या ठिकाणी बगीचा देखील असून त्या अनुषंगाने सकाळ संध्याकाळ क्रिडाप्रेमी नागरिक, जेष्ठ नागरिक, लहान मुले मैदानात खेळाचा आनंद घेत असतात. परंतू त्या ठिकाणी लग्न, जत्रा ,इतर कार्यक्रम करणारे लोक संपूर्ण मैदान घाण करून ठेवतात. आजूबाजूच्या नागरिकांना त्याचा मोठा त्रास होतो. यासर्व गोष्टींचा विचार करता हे मैदान कोणालाही भाड्याने देऊ नये अशा आशायाचे पत्र शिवसेना उपशर प्रमुख मोहन उगले यांनी कल्याण डोंबिवली मनपा आयुक्त यांना दिले होते. असे असतांना देखील रविवारी हे मैदान लग्नकार्यासाठी देण्यात आले. हा समारंभ झाल्यानंतर रात्रीच येथे साफसफाई होणे अपेक्षित होते. मात्र याठिकाणी उरलेले अन्न, जेवणचा इतर कचरा हा तिथेच पडून राहिल्याने आज सकाळी याची दुर्गंधी पसरली होती. यामुळे सकाळी खेळण्यासाठी येणारे खेळाडू आणि फेरफटका मारण्यासाठी येणारे नागरिक यांना या दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागला. केडीएमसी प्रशासनाला वारंवार सांगून देखील अमलबजावणी होत नसले तर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्याना तक्रार करायची का असा सवाल उगले यांनी केला आहे.

# शिवजल सुराज्य अभियानाचा शुभारंभ होणार

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते २६ डिसेंबर रोजी शुभारंभ होणार

शिवजल सुराज्य अभियान यशस्वीपणे राबवण्यासाठी ग्राम स्थांनी पुढाकार घ्यावा

**- मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे**

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी)**

दि.२४ : ठाणे ग्रामीण भागातील पाणी समस्या सोडविण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत 'शिवजल सुराज्य अभियान' राबविण्यात येत असून या अभियानाचे शुभारंभ दि. २६ डिसेंबर, २०२४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते शहापूर तालुक्यात करण्यात येणार आहे. मुरबाड व शहापूर तालुक्यातील टँकर ग्रस्त गावात ८५ तर इतर सर्व तालुक्यात १ हजार ५१५ वनराई बंधारे बांधण्यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घ्यावा व लोकचळवळ उभारून अभियान यशस्वीपणे पार पाडण्यासाठी जिल्हा परिषद, ठाणे विशेष प्रयत्न या अभियानामार्फत करत आहे.

गाव परिसरात पाण्याची साठवणूक करण्याच्या दृष्टिकोनातून; तसेच भूजल पातळी वाढण्यास मदत होण्यासाठी ओढ्यातील वाया जाणारे पाणी अडवून वनराई पद्धतीचा बंधारा बांधण्यात येणार आहे. सिमेंटच्या किंवा अन्य मोकळया गोण्यांमध्ये वाळू भरून बंधारा बांधला जाणार असून बहुतेक शेतकऱ्यांच्या शेता लगतच्या परिसरातून ओढा, नाला वाहत असल्याने पावसाळा संपल्यावर पाण्याचा प्रवाह कमी झाल्यावर आढ्या, नाल्यावर वनराई बंधारे बांधणे शेतकऱ्यांना वरदान ठरणार आहे. तसेच छतावरील पाऊस पाणी संकलनाची विविध योजनेतुन मंजुर कामे सुरु करण्यात येणार आहेत. जानेवारी अखेर पर्यंत वनराई बंधारे कामे पुर्ण करण्यासाठी लोक सहभाग, सामाजिक संघटना, शासकीय अधिकारी, कर्मचारी संघटना, जिल्ह्यात काम करणाऱ्या अशासकीय संस्था (NGO), ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा असे, आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे. या अभियानासाठी पुर्नः भरणाचे उद्दीष्ट व पाणी साठवण करण्यासाठी शहापूर तालुक्यात वनराई बंधारे/कच्चे बंधारे - ५० नियोजित काम असून त्याद्वारे साठवण ५० दश लक्ष लिटर पाणी उपलब्ध करून देण्यासाठी कामकाज करण्यात येणार आहे. तर मुरबाड तालुक्यात वनराई बंधारे/कच्चे बंधारे - ३५ नियोजित काम असून त्याद्वारे साठवण ३५ दश लक्ष लिटर पाणी उपलब्ध करून देण्यासाठी कामकाज करण्यात येणार आहे. तसेच शहापूर व मुरबाड तालुक्यातील टँकर ग्रस्त गाव व्यतिरिक्त अंबरनाथ तालुका -१००, कल्याण तालुका - १००, भिवंडी तालुका - ४५०, मुरबाड तालुका -४१५, शहापूर तालुका -४५० असे एकूण १ हजार ५१५ वनराई बंधारे/कच्चे बंधारे तयार करण्यात येणार आहे.

दि. २६ डिसेंबर, २०२४ ते ३० डिसेंबर, २०२४ पर्यंत ग्रामसेवक व कृषी सहाय्यक, यांनी प्रत्येक गावात शिवार फेरी घेऊन पाण्याचा ताळेबंद करून पाण्याच्या भूजल वाढीसाठी उपाययोजना राबवण्याच्या उद्देशाने काम करणार आहेत तसेच गटविकास अधिकारी यांनी उप अभियंता (पापु) पंचायत समिती, उप अभियंता, तालुका जल संधारण अधिकारी (लपा) व कृषी अधिकारी यांचे मार्फत छाननी करून यंत्राणानिहाय योजनांचा आराखडा तयार करणार आहेत व आवश्यक असलेल्या ठिकाणी कामकाज करण्याचे नियोजन वेळोवेळी करण्यात येईल अशी माहिती ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून देण्यात आली आहे.

कच्चे बंधारे/ वनराई बंधारे, साखळी सिमेंट बंधारे(नाला गाळ काढणे), के.टी.वेअर/ साठवण बंधारा दुरुस्ती/ नवीन कामे, पाझर तलाव/ गावतलाव दुरुस्ती/ गाळकाढणे/ नवीन कामे, खोल सलग समतळचर/ सलग समातरचर, पिण्यांच्या पाण्याची विहीर गाळ काढणे / दुरुस्ती, जलकुभ गाळ काढणे / नवीन बुडक्या, विंधण विहिरीव्दारे छतावरील पाऊस पाणी संकलन, रिचार्ज शाफट (नळयोजना विहीर स्त्रोत बळकटी करणासाठी), गॅबीयन बंधारे इ. सर्व उपाययोजना 'शिवजल सुराज्य अभियान' अंतर्गत राबवण्यात येणार आहेत. या सर्व कामांना नियोजित वेळेत पुर्ण करण्यासाठी श्रमदान, पाण्याचे सुयोग्य नियोजन करून गावातील पाणी पातळी वाढवण्यासाठी वनराई पद्धतीचा बंधारा बांधण्यासाठी सामाजिक संघटना, शासकीय अधिकारी, कर्मचारी संघटना, जिल्ह्यात काम करणाऱ्या अशासकीय संस्था (NGO) तसेच ग्रामस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येत आहे.

## नागरिकांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लागत नसल्याने

# राष्ट्रवादीचा आंदोलनाचा इशारा

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी)**

दि.२४ : राज्य सरकारची भीती नसलेल्या कल्याण डोंबिवली महापालिका प्रशासनाच्या भ्रष्ट व भोंगळ कारभारामुळे नागरिकांचे अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लागत नसल्याकारणाने नाईलाजाने धरणे आंदोल न करणार असल्याचा इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार पक्षाचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांनी दिला आहे.

नागरिकांच्या मुलभूत प्रश्नांवर २०२२ मध्ये कल्याण डोंबिवली महा पालिका प्रशासनाच्या भ्रष्ट व भोंगळ कारभारामुळे राष्ट्रवादीने जनआंदोलन केले होते. मोफत प्रसाधनगृह व सार्वजनिक मुतारी मिळण्यासाठी, अनधिकृत दुकानांमुळे अरूंद झालेले रस्ते व विद्रुप झालेले शहर स्वाचछ करण्यासाठी, सुसज्ज मोफत आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी व इतर गोष्टी, त्यावर महा पालिका प्रशासनाने कारवाई करण्याचे दिलेळे आश्वासन आजपर्यंत पुर्ण करण्यात आले नाही. त्यानंतर दिनांक ४/९/२०२३ रोजी कल्याण डोंबिवली महापालिका प्रशासनाने नागरिकांच्या जीवाची परवा न करता कायद्याला बगल देऊन पेट्रोल पंपाच्या जागेवर व पेट्रोल पंपाला लागून टोलेजंग बिल्डिंग बांधण्याची दिलेल्या परवानगी बद्दल मुख्यमंत्री कार्यालयाला तक्रार निवेदन दिले होते. त्यावर महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाने दिनांक १४/८/२०२४ रोजी कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्तांना कारवाई करण्याचे निर्देश दिले होते परंतु आजपर्यंत कुठलीच कारवाई करण्यात आली नाही.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले पत्र**

अशा अनेक नागरिकांच्या प्रश्नांवर कल्याण डोंबिवली महापालिका प्रशासनाबरोबर पत्र व्यवहार करून वेळोवेळी त्याबद्दल पाठपुरावा करून देखील महापालिका प्रशासनाने कुठलीच ठोस पावले उचलली नाहीत. राज्य सरकारने व राज्य प्रशासनाने याची दखल घेऊन नागरिकांचे प्रश्न जाणूनबुजून प्रलंबित ठेवणाऱ्या महापालिका अधिकाऱ्यांवर निलंबनाची कठोर कारवाई करावी. तसेच कल्याण डोंबिवली महापालिका प्रशासनाकडे असलेल्या प्रलंबित प्रश्नांचे १५ दिवसाच्या आत समाधान झाले नाही तर नाईलाजाने जनहितार्थ जनआंदोलन करणार असल्याचा इशारा नोवेल साळवे यांनी दिला आहे.




२४ डिसेंबर २०२४
मंगळवार

**मेष**
तुम्ही एखाद्या गोष्टीबद्दल थोडे गोंधळलेले असाल, एखाद्या खास मित्रासोबत शेअर केल्यास तुम्हाला आराम मिळेल.वाहन खरेदी करण्याचा निर्णय घेऊ शकता.

**वृषभ**
मोठे निर्णय घेण्यासाठी दिवस चांगला आहे. वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला आहे. घरी लहान पाहुणे येण्याची शक्यता आहे.

**मिथुन**
तुमच्या व्यवसायाला पुढे नेण्यासाठी काही योजना कराल ज्याचा तुम्हाला फायदा होईल.आज तुम्ही बहुतेक वेळा धार्मिक आणि अध्यात्मिक कार्यात व्यस्त असाल.

**कर्क**
सरकारी कामात तुम्हाला मोठा फायदा होण्याची शक्यता आहे. तुम्ही तुमच्या मुलांसोबत सहलीला जाऊ शकता. त्यांच्यासोबत चांगला वेळ घालवाल.

**सिंह**
दिवसाची सुरुवात चांगल्या मूडने होणार आहे.महिलांसाठी दिवस उत्तम राहील. व्यावसायिक आज एखाद्या महत्त्वाच्या बैठकीला उपस्थित राहू शकतात.

**कन्या**
कुटुंबाकडून पूर्ण सहकार्य मिळेलघराम ध्ये धार्मिक कार्य करण्याचे बेत आखता येतील.आज आपण मित्रांसोबत फोनवर बोलण्यात वेळ घालवू नका.

**तूळ**
विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे, परंतु अभ्यासात अधिक मेहनत करावी लागेल. तुमच्या कुटुंबातील सदस्यांसोबत चांगला वेळ घालवायला मिळेल.

**वृश्चिक**
एकाग्र चित्ताने केलेले काम फायदेशीर ठरेल. तुमच्या प्रियकरासाठी आजचा दिवस चांगला आहे.काम कमीत कमी वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न कराल.

**धनु**
समस्या हाताळण्यात व्यस्त असाल. कामाच्या ठिकाणी तुमच्या मेहनतीचे फळ मिळेल आणि आत्मविश्वास वाढून तुम्ही प्रगतीच्या मार्गावर पुढे जाल.

**मकर**
तुमच्या आधीच अस्तित्वात असलेल्या समस्यांचे समाधान मिळेल, ज्यामुळे तुमचे मन प्रसन्न राहील. कुटुंबात धार्मिक कार्याचे नियोजन करता येईल.

**कुंभ**
घर खरेदी करण्याचा विचार करणाऱ्या लोकांसाठी दिवस शुभ आहे.व्यावसायिक लोकांचा व्यवसाय चांगला होईल. प्रियकरासाठी दिवस चांगला असेल.

**मीन**
व्यवसाय चांगला चालेल आणि जीवनात सुख-समृद्धी येईल. नोकरदारांनी या महिन्यात कोणतेही महत्त्वाचे निर्णय घेण्याची घाई करू नये.

**दैनिक जीवनदीप वार्ता**

**मध्ये कंपनी, मिळकत, जमीन– जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/– रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.**

**:: कार्यालय ::**

९६१९९१८८५५८ / ९९५८०७८६०१

– E Mail -

jeevandeepvartanews2020@gmail.com news.thanejeevandeep@gmail.com

# 'चला डोक्यात दगड भरुया'

## कल्याणमध्ये भूगर्भशास्त्रावर आधारित कार्यशाळा संपन्न



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी)**

दि.२४ : मध्यमुंबई मराठी विज्ञान संघ व कल्याण डोंबिवली महानगरपालिका, शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मध्यमुंबई मराठी विज्ञान संघ, विद्यार्थी व समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा यासाठी विविध उपक्रम राबवत आहे. व्याख्याने शैक्षणिक सहली, परीक्षा व कार्यशाळा अश्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती वाढवण्याचा सतत प्रयत्न असतो. याच उपक्रमापैकी एक अशी भूगर्भशास्त्रावर आधारित कार्यशाळेचे आयोजन रविवारी कल्याण पश्चिमेतील शिशुविकास विद्यालय, बेतुरकर पाडा येथे आयोजित करण्यात आले.

त्यामध्ये 'पाषाणशास्त्र', 'खनिजशास्त्र या विषयावर आधी भूगोलात गती असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन व्याख्यान व नंतर प्रदर्शन भरविण्यात आले. प्रदर्शनात खनिजे, जीवाश्म, विविध प्रकारचे पाषाण इत्यादी भूशास्त्रीय नमुने ठेवले आहेत. प्रदर्शनाच्या पहिल्या सत्रात व्याख्यानात सहभागी झालेल्या विदयार्थ्यांना दगडांच्या नमुन्याचे जवळून निरीक्षण करायला मिळणार आहे.


या प्रदर्शनाचे उद्घाटन केडीएमसी उपायुक्त सोनम देशमुख, विलास लिखार, बालक मंदिर संस्था प्राथमिक शाळा कल्याण, मध्य मुंबई मराठी विज्ञान संस्था अध्यक्ष ज बा म्हात्रे, कार्यवाह अमेय परब, खजिनदार अंजली वर्तक व इतर पदाधिकारी आणि सभासद नूतन शिक्षण संस्था अध्यक्ष दीपक ब्रिद, उपाध्यक्ष नंदकुमार देशमुख, संचालक मंगेश पाटील व इतर सभासद, ज्येष्ठ समाजसेवक आत्माराम जोशी तसेच डॉक्टर अभिजीत पाटील यांच्याहस्ते करण्यात आले.डॉक्टर अभिजीत पाटील, ऋजुता पाटील, निखिल चौगले हे कोल्हापूरहून येऊन त्यांनी प्रदर्शन भरविले आहे.

प्रदर्शनाच्या कार्यामध्ये सर्व सी.आर. सी. प्रमुख, मुख्याध्यापक व एनएसएसचे स्वयंसेवक, शिशुविकास विद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचे मोलाचे सहकार्य मिळाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन मोहिनी कुलकर्णी यांनी केले.

## तेथे कर माझे जुळती

# साने गुरुजी जयंती

**( २४ डिसेंबर १८९९ -११ जून १९५० )**



'आपले राष्ट्रपिता महात्मा गांधी तुरुंगात आहेत. तो राजबिंडा जवाहरलाल नेहरू तुरुंगात खितपत पडला आहे. ते मूठभर इंग्रज लोक सातासमुद्रापलीकडून आपल्या कोट्यावधी लोकांवर राज्य करीत आहेत. आपल्याच बेईमान लोकांच्या मार्फत, हा राजगाडा हाकीत आहेत. तुम्ही कसे हे सहन करता ? आपली लहान लहान मुलं फटके खात आहेत. अनेकांच्या घरादारांची राख रांगोळी झाली आहे. फासाच्या तख्तावर आपल्या असंख्य तरुणांच्या माना अडकल्या आहेत. हे तुम्हाला कसं पाहवत ? तुम्ही असे षंडासारखे गप्प कसे ? आपण मेलेल्या आईचे दूध प्यालेले आहोत का ? शरम नाही वाटत तुम्हाला ! उठा, सत्याग्रहात भाग घ्या, जुलमी कायदे पायाखाली तुडवा. या इंग्रज सत्तेला सातासमुद्रा पलीकडे घालवा आणि आपला भारत देश स्वतंत्र करा। हे इंग्रजांची बूट चाटणारे यमदूत मला पकडण्यासाठी आले आहेत. मी जरी पकडला गेलो तरी, माझ्या खान्देशाने मागे राहता कामा नये. शेकडोनी सत्याग्रह करा. तुरुंगात जा. इंग्रज सत्तेला सळो की पळो करून सोडा '...


खान्देशातील अंमळनेरच्या गांधी चौकात झालेले साने गुरुजींचे हे ऐतिहासिक व आवेश पूर्ण भाषण आजही प्रेरणादायी वाटते. पांडुरंग सदाशिव साने म्हणजेच जणू अग्निबाण ! जाज्वल्य देशभक्ती, त्याग, सेवा, स्वावलंबन अपार करुणा व प्रेम यांचा सुरेख संगम होय. अत्यंत तळमळीचे कार्यकर्ते, भावनाशील साहित्यिक, उत्तम संपादक, सच्चे सेवक. संस्कार भूषण, प्रभावी वक्ते, उत्तम राजकारणी, प्रभावी प्रचारक, संत प्रवृत्तीचे उत्तम शिस्तप्रिय शिक्षक म्हणजे साने गुरुजी! त्यांची कर्मभूमी खानदेश होती. साने गुरुजींचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे गरीब कुटुंबात झाला.

पांडुरंगांना आई प्रेमाने' श्याम' म्हणायच्या. श्यामची आई म्हणजे थोर हृदयाच्या यशोदामाई ! प्रतिकूल परिस्थितीवर मात करून ते शिकले.

लहान वयात देखील त्यांच्या मनात कणव होती. गरिबां बद्दल अपार माया होती. आईचे अंतःकरण त्यांना लाभले होते. सर्व अडचणींवर मात करून श्याम चांगल्या मार्कांनी मॅट्रिकची परीक्षा पास झाले. नंतर न्यू पूना कॉलेजमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांनी त्यांना बी. ए. ला मराठी विशेष शिकवला. गुरुजी मराठी विषय घेऊन चांगल्या मार्कांनी बी. ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले.

ते तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी अमळनेरच्या तत्त्वज्ञान मंदिरात दाखल झाले. तेथे त्यांना ६० रुपये फेलो शिप मिळायची अंमळनेर म्हणजे विद्येचे तीर्थक्षेत्र होते. अमळनेरचे नाव साने गुरुजीं मुळे देशभर गाजले प्रसिद्ध झाले. गोपाळराव गोखले हे मुख्याध्यापक असलेल्या खान्देश एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूल मध्ये साने गुरुजी शिक्षक म्हणून लागले. १७ जून १९२४ रोजी ते शिक्षक म्हणून ५० रुपये महिना पगारावर रुजू झाले. मायेच्या वृतीने साने सर शिकवत असल्याने साऱ्या विद्यार्थ्यांचे त्याकाळी ते आवडते शिक्षक बनले.

आजही नितांत गरज आहे अशा विचारांची नि संस्कारांची वसतीगृहातील मुलांची आई म्हणून ते वावरले. मायेच्या ममतेने सेवा करून गुरुजींनी विद्यार्थी घडविले.




**डॉ. आनंदराव सूर्यवंशी**

# श्रमिक ज्येष्ठ नागरिक संघाचा रौप्य महोत्सव संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/मुंबई(प्रतिनिधी)**

दि.२४ : श्रमिक ज्येष्ठ नागरिक संघ, डिलायरोड, मुंबई यांचा रौप्य महोत्सवी समारंभ २०२४ मोठया उत्साहात व धूमधडक्यात साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे नाट्य, सिने अभिनेते व दिग्दर्शक श्री प्रमोद पवार, महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) मुंबई नवी मुंबईचे अध्यक्ष श्री सुरेश पोटे, संघांचे सल्लागार विजय औधे, पदसिद्ध सदस्य शरद डिचोलकर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरवातीला सरस्वती व कै. विवेक खाडेंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला, प्रमुख अतिथी पाहुणे या सर्वांनी दीप प्रज्वलन केले.साने गुरुजीच्या खरा तो एकची धर्म या प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरवात झाली. श्री शाम नाईक यांनी जाने कहाँ




गये वोदिन या चित्रगीतावर स्वागतपर बहारदार नृत्य सादर केले. श्री शशी कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले.

या कार्यक्रमात १९ ज्येष्ठ नागरिक ७५ वर्ष पूर्ण केल्या बद्धल सन्मान करण्यात आला, त्यानंतर संघाच्या अथपासून इतिपर्यंत महनीय १० व्यक्तींचा मारणोत्तर जीवन गौरव स्मरणिका, सन्मान चिन्ह, पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या कुटूंबाचा गौरव करण्यात आला तर ५ व्यक्तींना जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. या पुरस्काराचे वितरण फेस्कॉम मुंबई नवी मुंबई अध्यक्ष मा. श्री सुरेश पोटे व श्री शरद डिचोलकर यांच्या हस्ते करण्यात आले रौप्य महोत्सवा निमित्त स्मरणिका प्रकाशित करण्यात आली याचे प्रकाशन श्री प्रमोद पवार यांच्या हस्ते करण्यात आले ज्येष्ठानी प्रचंड उत्साह व जोश असाच कायम ठेवावा असे आवाहन ही सुरेश पोटे यांनी केले. श्री प्रमोद पवार यांनी पूर्वी मी येथेच रहात होतो मी माझ्या घरी आलो आहे संघाला रौप्य महोत्सवाच्या शुभेच्छा देतो हे कार्य अखंड सुरू ठेवा असा मंत्र दिला.

संघांचे अध्यक्ष श्री गणेश पोशीरकर यांनी संघाच्या वाटचालीची बाबत सभासदांना माहिती दिली. आभार प्रदर्शन व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# आभा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान योजनेची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करावी

## - अतिरिक्त सचिव डॉ.नवल जीत कपूर



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ रायगड(प्रतिनिधी)**

दि.२४ : धर्ती आभा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान ही केंद्र शासनाची महत्वाकांक्षी योजना असून या योजनेचा लाभ जिल्ह्यातील आदिवांना बांधवांना देण्यासाठी जिल्ह्य प्रशासनाने प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश अतिरिक्त सचिव,आदिवासी व्यवहार मंत्रालय, भारत सरकार डॉ.नवल जीत कपूर यांनी आज दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अंबादास देवमाने, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प आत्माराम धाबे, उपजिल्हाकारी (पुनर्वसन) भारत वाघमारे यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना अतिरिक्त सचिव, डॉ.नवल जीत कपूर म्हणाले की, आदिवासी बांधवांसाठी प्रधानमंत्री जनमन योजना या नावाने दि.१५ नोव्हेंबर २०२३ रोजी सुरु झालेल्या योजनेचे दि.२ ऑक्टोबर २०२४ रोजी धर्ती आभा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान योजना नावाने नामांतर करण्यात आले आहे. आदिवासी बांधवांच्या कल्याणासाठी ही एक महत्वाकांक्षी योजना असून या योजनेचा आदिवासी बांधवांना लाभ द्यावा. जिल्ह्यातील आदिवासी बांधवांचा विकास व्हावा, त्यांना पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात याकरिता केंद्र व राज्य शासन अनेक योजना राबवित आहे. या योजनेचा लाभ अधिकाधिक आदिवासी बांधवांना मिळावा याकरिता संबधित विभागातील अधिकाऱ्यांनी महिन्यातील एक दिवस या योजनेसाठी द्यावा, अशा सूचनाही त्यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या. या योजनेसाठी सकारात्मक भूमिका ठेवून काम केल्यास योजना अधिकाधिक गतिमान होईल व त्याचा लाभ आदिवासी बांधवांना मिळेल. ज्या आदिवासी बांधवांचे बँक खात्याशी आधार संलग्न नसेल तर त्यांचा सर्व्हे करुन ते काम लवकरात लवकर पूर्ण करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.आदिवासीच्या विविध योजनांसाठी असलेले अनुदान वाढवून देण्यासाठी शासनाकडून प्रयत्न केले जात आहेत. या योजनेविषयी काही अडचणी असतील तर अधिकारी वर्गाने माझ्याकडे संपर्क करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी उपिस्थित अधिकाऱ्यांना केले. यावेळी उपस्थितांना दूरदृष्य प्रणालीद्वारे धर्ती आभा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान योजनेची माहिती देण्यात आली.

# कमलादेवी विद्यालयाचा 'कमलांजली' कलामहोत्सव संपन्न




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ उल्हासनगर(प्रतिनिधी)**

दि.२४ : गेली अनेक वर्षे विठ्ठल वाडी व आसपासच्या उपनगरातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व कलात्मक विकासा साठी कार्यरत कमलादेवी महाविद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन कलामहोत्सव कमलांजली विद्यार्थ्यांनी मोठ्या जल्लोषात साजरा केला. विठ्ठल वाडी परिसरातील या प्रथितयश कमलादेवी शिक्षण संस्थेच्या कमलादेवी कला, वाणिज्य आणि विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा हा कमलांजली महोत्सव काल दिनांक १९ डिसेंबर २०२४ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात पार पडलाय.

यात विद्यार्थी कलावंतांनी लोककला, नृत्य, नर्तन, गायन अशा विविध कलाप्रकारांचं सादरीकरण केले. याप्रसंगी कलावंतांनी प्रेक्षकांचं मन मोहुन घेतलं. तर महाविद्यालया ची विद्यार्थीनी मनोकामना पाल हीने ' मिस कमलांजली ' चा किताब पटकावला. या कार्यक्रमास मुख्य अतिथी मुथा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश मुथा उपस्थित होते. तसेच, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे अभियंता अशोक घोडे, शैलेश मळेकर ही आवर्जून उपस्थित होते.

महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच आपल्या अन्य कलागुणांना जोपासणे, उजाळा देणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन शैलेश मळेकर यांनी यावेळी केले. तर, अध्यक्षीय भाषणात संस्थेचे अध्यक्ष सदानंद तिवारी यांनी विद्यार्थ्यांना मोलाचा संदेश देत यावर्षी इयत्ता बारावीला असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या येणाऱ्या परीक्षा काळासाठी देखील शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी प्राचार्या डॉ. सिम्मी सिंह, पालकवर्ग आणि सह - विद्यार्थी उपस्थित होते.

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका सचिवपदी किशोर शेळके

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी)**

दि.२४ : कल्याण डोंबिवली महापालिकेचे सचिव म्हणून किशोर शेळके यांची महापालिका आयुक्तांनी पदोन्नती देऊन नियुक्ती केली आहे. उपसचिवपदी असणाऱ्या व प्रभारी सचिव पद भूषविलेल्या शेळके यांना सचिव पदावर पदोन्नती झाल्याने महापालिकेला ही पूर्णवेळ सचिव मिळाला आहे. २० डिसेंबर २०२४ रोजी या संदर्भातील आदेश त्याला प्रशासनातर्फे देण्यात आला आहे. शेळके हे बीकॉम एलएलबी पदवीधारक आहेत.

२० जुलै १९७० मध्ये एका शहापूर तालुक्यातील सापगाव खेड्यात त्यांचा जन्म झाला. जिल्हा परिषद शाळा गवी खाडे - विद्यालय, सोनू भाऊ बसवंत महाविद्यालय अशा विविध ठिकाणी १९९२ पर्यंत शिक्षण त्यांनी घेतले.



**कल्याण डोंबिवली महापालिकेचे सचिव म्हणून किशोर शेळके यांची महापालिका आयुक्तांनी पदोन्नती देऊन नियुक्ती**

जिल्हा परिषद कर्मचारी पतपेढी पासून - त्यांच्या सेवेला सुरुवात झाली. १९९३ मध्ये एमपीएससी परीक्षेत ते पास झाले परंतु कुठलीही नोकरी मिळाली नाही त्यामुळे पुन्हा ते ठाणे जिल्हा कर्मचारी पतपेढीमध्ये कामावर हजर झाले. १९९५ पासून लिपिक पदावर कल्याण डोंबिवली महापालिकेमध्ये त्यांनी सेवा सुरू केली.

एमपीएससी परीक्षा पास - झाल्यानंतर १९९५ मध्ये मंत्रालयातील क्रीडा व सांस्कृतिक खात्यावर हजर होण्याचा आदेश मिळूनही त्यांनी तो झुगारला. २०१२ मध्ये - महा पालिका उपसचिव पदाची त्यांना पदोन्नती दिली गेली.२०१९ मध्ये त्यांना उपसचिव पदावर महा पालिकेतर्फे नियुक्ती दिली गेली. आता २०२४ मध्ये महापालिका सचिव वर्ग एक पदावर त्यांची नियुक्ती झाली आहे. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# 'चिमुकली वरील लैंगिक अत्याचार प्रकरणी दोषींवर कारवाई करावी'

## - आमदार राजेश मोरे

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी)**

दि.२४ : कल्याण ग्रामीण मतदार संघातील आडीवली परिसरात इमारतीत खेळणाऱ्या एका ९ वर्षाच्या मुलीशी इमारतीत राहणाऱ्या उत्तम पांडे नावाच्या परप्रांतीय इसमाने अश्लील चाळे करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी बोलताना आमदार राजेश मोरे यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना पोलिसांना दिल्या आहेत.

आडीवली परिसरात एका इमारतीत रात्रीच्या सुमारास खेळत असलेल्या ९ वर्षांच्या मुलीला घरात ओढून घेत तिच्याशी लगट करणाऱ्या परप्रांतीय पांडे याला जाब विचारण्यासाठी गेलेल्या या चिमुरडीच्या आई वडील आणि आजीला पांडे दांपत्याने शिवीगाळ धक्काबुक्की केल्याचा प्रकार शनिवारी रात्रीच्या सुमारास घडला होता. याप्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी आमदार मोरे यांनी केली आहे याबाबतच्या सूचना मानपाडा पोलिसांना दिल्याचे त्यांनी सांगितले.

# 'एका हातात पुस्तक तर दुसऱ्या हातात गुरुचा हात असू द्या'

## - डॉ. दिनेश गुप्ता

### सम्राट अशोक विद्यालयात बाल जत्रा महोत्सव संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी)**

दि.२४ : कल्याण पूर्वेच्या सम्राट अशोक विद्यालयात कृतीयुक्त शिक्षणावर भर दिला जातो. विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून रूढी, परंपरा व आनंददायी शिक्षण दिले जाते. नुकताच मराठी व इंग्रजी माध्यमाचा बाल जत्रा महोत्सव संपन्न झाला. जत्रा महोत्सवात विद्यार्थ्यांनी घरूनच बनवून आणलेले खाद्यपदार्थांचे स्टॉल लावलेले होते. तसेच मनोरंजन व आनंद लुटण्यासाठी फिरता पाळणा,होडी,झुला, मिनी ट्रेन असे विविध खेळणी ठेवण्यात आले होते.

माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक गुलाबराव पाटील म्हणाले बाल जत्रा






महोत्सव माध्यमातून विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थांचे स्टॉल लावले खरेदी विक्रीतून झालेला आर्थिक नफा तोटा किती झाला हे विद्यार्थ्यांना कळाले या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यवहारिक ज्ञानाची आवड निर्माण करण्याचा प्रयत्न केला. महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद महत्त्वपूर्ण होता.

बाल जत्रेच्या उद्घाटन प्रसंगी कोळसेवाडी पोलीस स्टेशनचे सहाय्यक वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष पानसरे, संस्थेचे अध्यक्ष पी. टी. धनविजय व प्रोफेसर डॉ. दिनेश गुप्ता उपस्थित होते दिनेश गुप्ता मुलांबरोबर संवाद साधताना म्हणाले मुलांनो बाबासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे आपण आयुष्यभर शिकत असतो सकारात्मक विचार करत आपण ठरवायचे आहे की आपल्याला काय बनायचं आहे. आपली आर्थिक परिस्थिती कशीही असू द्या पण शिक्षण घ्या. एका हातात पुस्तक आणि एका हातात आपल्या गुरुचा हात असू द्या. आई- वडिलांचे नेहमी धन्यवाद माना. आजच्या कार्यक्रमातून खूप आनंद घ्या असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. तर सहायक वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष पानसरे म्हणाले, मी माझ्या आयुष्यात पहिल्यांदा असा कार्यक्रम पाहत आहे. आपल्याला या शाळेतून आनंददायी शिक्षण दिले जाते. विद्यार्थी मित्रांनो आयुष्यात व्यसनाधीन होऊ नका तुम्ही आज शपथ घ्या की मी आयुष्यात कधीही व्यसनाधीन होणार नाही. गुन्हेगारी प्रवृत्ती पासून लांब राहा स्वतःचे आयुष्य उज्वल करा.

बाल जत्रेत विद्यार्थ्यांसह स्थानिक नागरिक व पालकांनी उस्फुर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक गुलाबराव पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन गणेश पाटील यांनी केले. पाहुण्यांचे आभार प्राथ. मुख्याध्यापिका सुजाता नलावडे यांनी मानले.

# अरे संसार संसार जसा तंबू डोक्यावर

## ही परिस्थिती आजही रस्त्यावर संसार मांडताना

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ मुरबाड(बाळासाहेब भालेराव)**

दि.२४ :संसार म्हटला की भांडीकुंडी घरदार कपाट पलंग आणि आताच्या जमान्यात तर लाखो करोडच संपत्ती म्हणजे संसार परंतु अरे संसार संसार जसा तवा चुलीवरआधी हाताला चटके मग मिळते भाकर बहिणाबाईंच्या गाण्याप्रमाणे संसाराची व्याख्या त्यांनी आपल्या कवितेतून मांडले आहे.

आधुनिक काळातला माणूस आणि आताच्या कलियुगातला माणूस याच्यामध्ये जमीन असण्याचा फरक आहे घर नाही दार नाही वर्षाचे बारावी महिने डोक्यावर संसार घेऊन फिरणारी अनेक कुटुंबे आहेत अशाच प्रकारे ठाणे जिल्ह्याच्या मुरबाड तालुक्यात टोकावडे करचोंडे फाट्याजवळ सह्याद्री पर्वतीच्या समोर अशाच



प्रकारची राहूटी (तंबू)टाकून त्या कुटुंबाने आपला संसार मांडला आहे कोणत्याही प्रकारचा लावा जमा नाही हातावर कमवायचे आणि पानावर खायचे अशा प्रकारचे या माणसांचे जीवन आहे माणूस प्रगती करतोय लाखो करोडची संपत्ती कमवणारे आणि आलिशान घरांमध्ये राहणारे लोक आणि अशा तंबूमध्ये वर्षाचे बारा महिने आपला संसार डोक्यावर घेऊन फिरणारे अनेक कुटुंबे आहेत शासनाने सुद्धा अशा कुटुंबांचा सर्वे करून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करायला हवा अशी मागणी यातून पुढे येऊ लागली आहे सदर कुटुंबांचा सर्वे करून गाव तालुका जिल्हा याची माहिती घेऊन स्थानिक भूमिपुत्र असलेल्या या लोकांचे पुनर्वसन करणे व त्यांना रोजगार देणे हे सरकारचे आद्य कर्तव्य आहे स्थानिक तहसीलदार, जिल्हाधिकारी, ग्रामपंचायत, पंचायत समिती, अशा प्रशासनाच्या अधिकारी वर्गाने याची दखल घेऊन अशा लोकांना न्याय द्यायला हवा असे जाणकार नागरिकांनी माहिती देताना सांगितले.

### कै.चंद्रकांत भोईर यांनी साकारलेल्या

# संत शिरोमणी रोहिदास महाराज चौकाचे होणार नुतनीकरण




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**
दि.२४ : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे प्रथम स्थाई समिती सभापति कै. चंद्रकांत भोईर यांनी कल्याण (प ) येथे साकारलेल्या संत शिरोमणी रोहिदास महाराज चौकाचे आता नुतनीकरण होण्याचे संकेत दिसायला लागले आहेत. रविवारी चौकात चर्मकार समाज बांधवांनी नूतनीकरणासाठी भव्य भूमिपूजन केले.

ह्या वेळी आपले मत व्यक्त करताना कै.चंद्रकांत भोईर यांचे चिरंजीव शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) चे विधानसभा सह संघटक रूपेश चंद्रकांत भोईर यांनी सांगितले की संत रोहिदास समाज मंडळाने अथक प्रयत्न करून कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेकडून समाजिक उपक्रम निधीच्या माध्यमातून सदर चौकाचे नवीनीकरणा साठी खास प्रयत्न केले आणि आज आपण सुशोभिकरणा साठी इथे उपस्थित आहोत. रूपेश भोईर यांनी समाजाचे सर्व लोकांचे खास करून समाजाचे अध्यक्ष महेश भोईर आणि त्यांचे सहकारी वरिष्ठ पत्रकार सुरळकर यांचे आभार मानले. ह्या वेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) चे परिवहन विभागाचे ठाणे जिल्हा प्रमुख निलेश भोर समवेत समाजसेवक विष्णु सातवे , नारायण वाळंज , पंढरीनाथ भोईर , विनोद गायकवाड, सागर जाधव , विकास रोकडे , गणेश वाळंज, सुनील वाळंज, नीतिन भोईर , अभिषेक निंबाळकर, सागर मनियार , अश्विन सातवे , योगेश रोकडे व कल्पेश रोकडे व चर्मकार समाजाचे लोक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

### मिरा भाईंदर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत

# प्लास्टिक वापर व अस्वच्छता पसरविणाऱ्यांविरोधात दंड वसुली




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**भाईंदर(प्रतिनिधी) :**
दि.२४ : मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भाप्रसे) यांच्या निर्देशानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाने प्लास्टिक वापर व अस्वच्छता पसरविणाऱ्या विरोधात दंडात्मक कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. दिनांक १६ ते २१ डिसेंबर २०२४ पर्यंत ६ लाख इतकी दंड वसुली महानगर पालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाने प्लास्टिक वापर व अस्वच्छता पसरविणाऱ्या विरोधात दंडात्मक कारवाई करून रु. ६,४६,७०२/- इतकी दंड वसुली करण्यात आली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक ०१ ते प्रभाग समिती क्रमांक ०६ अंतर्गत नियमित महापालिकेच्या स्वच्छता निरीक्षक व त्यांच्या टीम मार्फत प्लास्टिक वापर व अस्वच्छता पसरविणाऱ्या विरोधात दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. प्रभाग समिती क्रमांक ०१ व ०२ मध्ये स्वच्छता निरीक्षक व त्यांच्या टीमने रु. १,४०,७५०/-, प्रभाग समिती क्रमांक ३ व ४ मध्ये स्वच्छता निरीक्षक व त्यांच्या टीमने रु. ३,१४,७५०/-, प्रभाग समिती क्रमांक ०५ मध्ये स्वच्छता निरीक्षक व त्यांच्या टीमने रु. ४०,१००/- व प्रभाग समिती क्रमांक ०६ मध्ये स्वच्छता निरीक्षक व त्यांच्या टीमने रु.१,५१,१०२/- अशी एकूण रु. ६,४६,७०२/- एवढ्या रकमेची दंडात्मक कारवाई केली आहे.

एकल वापर प्लास्टिक बंदी कारवाई, सार्वजनिक ठिकाणी तसेच रस्त्यांवर थुंकणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकून अस्वच्छता पसरवणे इत्यादी प्रकारे महापालिका क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत कारवाई करण्यात येत आहे. स्वच्छतेचे महत्व जाणत आपल्या शहराला स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी विविध उपक्रम महापालिकेच्या माध्यमातून नेहमीच राबवण्यात आले आहेत. तसेच सफाई कर्मचाऱ्यांचे शहर स्वच्छ ठेवण्यात मोलाचे योगदान तर आहे पण यासोबतच आपण सर्व नागरिकांनी देखील शहर स्वच्छ ठेवण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.


# मुरबाड नगरपंचायत, मुरबाड

ता. मुरबाड,जि. ठाणे - ४२१४०१ Email id. mnpmurbad@gmail.com .Ph no 02524225905

**निविदा सूचना**

मुरबाड नगरपंचायतीकरिता Organic Waste Composting मशीन पुरवठा करणे कामी नोंदणीकृत संस्था/व्यक्ती यांचेकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत.निविदा तपशील http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदेचे सादरीकरण ऑनलाइन दि.२४/१२/२०२४ ते दि.०७/०१/२०२५ कालावधीत करावयाचे आहे.

(शिक्का)


सही/-
मुख्याधिकारी
मुरबाड नगरपंचायत
मुरबाड

जा.क्र.मु.न.प./२३६०/२०२४-२५
दि.२३/१२/२०२४


### भिवंडी मनपाच्या आरोग्य विभागातर्फे

# क्षयरुग्णांची शोध मोहीम

**२३ डिसेंबर २०२४ ते ०३ जानेवारी २०२५ पर्यंत चालणार शोध मोहीम**



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**भिवंडी(प्रतिनिधी) :**
दि.२४ :भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका नागरी आरोग्य विभाग अंतर्गत सक्रिय क्षयरुग्ण शोधमोहीम दि. २३ डिसेंबर २०२४ ते दि. ०३ जानेवारी २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. सदर मोहिमेत भिवंडी महानगर पालिका भागातील अतिजोखमीच्या भागात लोकसंख्येचे सर्वेक्षण आशा व आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन घरामधील सर्व सदस्यांची क्षयरोग आजाराबाबतची तपासणी करणार आहेत. भिवंडी मनपा कार्यक्षेत्रातील शहरी भागातील अति जोखमीच्या घरांचे सर्वेक्षण २३ डिसेंबर २०२४ ते ०३ जानेवारी २०२५ रोजी करण्यात येणार आहे. सदर सर्वेक्षण मोहिमेसाठी ४१ पथकांची निर्मिती करण्यात आली असुन सदर पथकात ८२ आशा यांच्याव्दारे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. सदर मोहिमेचे ८ पर्यवेक्षकांव्दारे सव्हेक्षण करण्यात येणार आहे. सदर मोहिमेदरम्यान आशा व आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन ज्या व्यक्तींना दोन आठवडयापेक्षा अधिक कालावधीचा खोकला, दोन आठवड्यापासुन येणारा ताप, वजनात घट, भुक न लागणे, मानेवर व इतरत्र गाठी येणे आदी लक्षणे असणा-या संशयित व्यक्तीची तपासणी करण्यात येणार आहे, लक्षणे आढळून आल्यास सदर व्यक्तीची तात्काळ थुकी नमुने, क्ष-किरण तपासणी करून तपासणीमध्ये क्षयरोग आढळून आल्यास रुग्णास क्षयरोगावरील औषधोपचार पूर्णतः मोफत सुरु करण्यात येणार आहे. तरी भिवंडी मनपा कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांना भिवंडी मनपाचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री अजय वैद्य, तसेच मा. वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. संदीप गाडेकर आणि मा. शहर क्षयरोग अधिकारी डॉ. बुशरा सय्यद यांनी आवाहन केले आहे की, आपल्या घरी येणाऱ्या आशा व आरोग्य कर्मचारी यांना माहिती देऊन सहकार्य करावे.

### सांज(काव्या)संजय भोईरचा दहिसर

# केंद्रस्तरीय शालेय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**डोंबिवली(शरद शहाणे) :**
दि.२४ : शालेय शिक्षण घेत असताना आपल्यातील कला गुणांना वाव देत व्यासपीठ मिळण्यास विद्यार्थी आपल्या आई - वडिल, गुरूंचे, शाळेच नव्हे तर शहर, गावाचे नाव राज्यपातळीवर, देशपातळीवर उंचावितात.१४ गावातील पिंपरी गावात १९ तारखेला पार पडलेल्या ठाणे जिल्हा परिषद अंतर्गत दहिसर केंद्र स्तरीय शालेय विविध गुणदर्शन स्पर्धेतील वक्तृत्व स्पर्धेत बामल्ली येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेत असलेल्या पाचवीतील सांज (काव्या) संजय भोईर हिने प्रथम क्रमांक पटकविला.
सांज (काव्या) हिचे ठाणे जिल्ह्यात कौतुक होत असून आपल्या गावाचे नाव मोठे केल्याबद्दल गावात तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# कल्याण बाजारपेठ पोलिस ठाण्यात सॉफ्टवेअर इंजिनिअर पतीवर गुन्हा दाखल

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**
दि.२४ :कल्याण पश्चिममध्ये एका २८ वर्षीय विवाहित मुस्लिम महिलेला तिच्या सॉफ्टवेअर इंजिनिअर पतीकडून पंधरा लाख रुपये माहेरून आणण्यासाठी दबाव टाकण्यात आला. त्यानंतर पतीने तिला बॉससोबत शारीरिक संबंध ठेवण्याची सक्ती केली, पत्नीने नकार दिल्यानंतर पतीने मारहाण करत तिहेरी तलाक दिला आणि तिला घराबाहेर काढले.
सोहेल हनिफउद्दीन शेख असे या पतीचे नाव असून सध्या याप्रकरणी बाजारपेठ पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी पुढचा तपास सुरू केला आहे. सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांनी या गुन्ह्याप्रकरणी प्रसिद्धी माध्यमांना सांगितले की, छत्रपती संभाजी नगर येथील जी.सी.पोलीस स्टेशन मध्ये दाखल झालेल्या आणि बाजार पेठ पोलीस स्टेशन मध्ये आलेल्या गुन्ह्यातील फिर्यादी च्या तक्रारी नुसार पहिल्या पत्नीला १५लाख रू तलाकापोटी द्याचे असून या संदर्भात दुसऱ्या पत्नी चा शारीरिक मानसिक छळ केल्याप्रकरणी, घरातून हकलवून देत पत्नीला तिहेरी तलाक दिल्या प्रकरणी बाजार पेठ पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. बाजार पेठ पोलीस याप्रकरणी पुढील तपास करीत आहेत.

# नवीन वर्षात भेटीला येणार दाभाडे कुटुंब

### ‘फसक्लास दाभाडे’ चित्रपटाचा धमाकेदार टीझर रिलीज

काही दिवसांपूर्वीच दाभाडे कुटुंबीयांनी गुलाबी थंडीत मस्त ‘यल्लो यल्लो’ हळदीचा जबरदस्त समारंभ साजरा केला. त्यावेळी या दाभाडे कुटुंबाची थोडी तोंडओळख प्रेक्षकांना झालीच. मात्र नुकत्याच प्रदर्शित झालेल्या टीझरमधून ही दाभाडे फॅमिली का फसक्लास आहे, याचा अंदाजही प्रेक्षकांना आला आहे. ‘फसक्लास दाभाडे’ चित्रपटाचा टिझर नुकताच सोशल मीडियावर झळकला असून या कुटुंबाला भेटण्याची आता प्रेक्षकांना प्रचंड उत्सुकता लागली आहे. हेमंत ढोमे लिखित, दिग्दर्शित या चित्रपटात क्षिती जोग, सिद्धार्थ चांदेकर, अमेय वाघ, निवेदिता सराफ, हरिष दुधाडे, राजन भिसे, राजसी भावे यांच्या प्रमुख भूमिका आहेत.
हेमंत ढोमे यांचे चित्रपट नेहमीच वास्तविकतेला धरून असतात. त्यातील पात्रे नेहमीच आपल्या आजूबाजूची, आपल्या घरातील असतात आणि म्हणूनच त्यांचे चित्रपट प्रेक्षकांना खूप जवळचे वाटतात. असेच एक तुमच्या आमच्या सारखे कुटुंब प्रेक्षकांना ‘फसक्लास दाभाडे’ मध्ये पाहायला मिळणार आहे. टीझरमध्ये हसतं-खेळतं दाभाडे कुटुंब दिसत असून भावंडांमधील भांडणे, कुरबुरी यात दिसत आहेत. हे सगळे दिसत असतानाच त्यांच्यातील घट्ट बॉण्डिंगही दिसत आहे. दाभाडेंच्या घरातील या तीन खांबांना भेटणं म्हणजे प्रेक्षकांसाठी पर्वणी असणार आहे.




निर्माते भूषण कुमार म्हणतात, ‘फसक्लास दाभाडे’ हा चित्रपट कुटुंबातील प्रत्येकासाठी खास असणारा आहे. प्रत्येक वयोगटासाठी असणारा हा चित्रपट प्रेक्षकांनी सहकुटुंब पाहावा. हा चित्रपट पाहाताना यातील प्रत्येक व्यक्तिरेखा प्रेक्षकांना आपल्याच घरातील भासेल. चेहऱ्यावर हास्य आणणारा हा चित्रपट आवर्जून बघावा.’’
निर्माते आनंद एल राय म्हणतात, ‘फसक्लास दाभाडे’ हा चित्रपट म्हणजे कुटुंबातील नातेसंबंधांचा उत्सव आहे. जो हास्य, भावना आणि जीवनातील साध्या क्षणांचा आनंद साजरा करतो. हेमंत ढोमे यांची लेखणी आणि दिग्दर्शनाचा नवा दृष्टिकोन प्रेक्षकांना नक्कीच आकर्षित करतो. या चित्रपटाच्या माध्यमातून आम्ही प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर हसू फुलवण्यासाठी उत्सुक आहोत’.
चित्रपटाचे दिग्दर्शक हेमंत ढोमे म्हणतात, ‘फसक्लास दाभाडे’ हा फक्त एक चित्रपट नाही तर कुटुंबातील विविध पैलूंना हसत-खेळत उलगडणारी एक सफर आहे. आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यातल्या जुन्या क्षणांचा, आपल्या कुटुंबाच्या प्रत्येक आठवणींना उजाळा देणारा एक फोटो अल्बमच आहे. प्रत्येक प्रेक्षकाला हा चित्रपट आपलासा वाटेल याची खात्री आहे.
खुळ्या भावंडांची ही इरसाल स्टोरी प्रेक्षकांना २४ जानेवारीपासून मोठ्या पडद्यावर पाहाता येणार आहे. टी-सीरीज, कलर येल्लो प्रॉडक्शन आणि चलचित्र मंडळी निर्मित ‘फसक्लास दाभाडे’चे भूषण कुमार, कृष्ण कुमार, आनंद एल राय आणि क्षिती जोग निर्माते आहेत. चित्रपटाचे वितरण पॅनोरमा स्टुडिओज करत आहे.

# आर्थिक उदारीकरणाचे जनक : पी व्ही नरसिंहराव



भारताचे माजी पंतप्रधान, नवीन आर्थिक धोरणांची सुरवात करणारे, विद्वान व्यक्तिमत्व पी व्ही नरसिंहराव यांची आज पुण्यतिथी. २८ जून १९२१ रोजी आंध्रप्रदेशातील करीमनगर जिल्ह्यातील वंगारा या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ येथे झाले. मातृभाषा तेलगूबरोबरच हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड यासारख्या दहा भाषांसह सहा विदेशी भाषा देखील त्यांना अवगत होत्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात आणि हैदराबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला.

१९३५ साली हैदराबादच्या निजामाने विद्यापीठात वंदे मातरम हे गीत गाण्यास बंदी घालून निजामाचे गौरव करणारे गीत गाण्याचा आदेश दिला होता तेंव्हा विद्यार्थी दशेतील नरसिंहराव यांनी त्याला कडाडून विरोध केला होता. १९६२ साली ते पहिल्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री बनले. १९७१ सालापर्यंत ते केंद्रात मंत्री होते. या दरम्यान त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्वाची खाती सांभाळली. १९७१ ते १९७३ या काळात ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात भूमी सुधारणा लागू करणारे आंध्रप्रदेश हे भारतातले पहिले राज्य बनले.

१९७७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले पण नरसिंहराव विजयी झाले. १९८४ व १९८९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून लढवली व जिंकली. १९९१ साली राजीव गांधी यांच्या हत्येनंतर ते काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बनले. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर त्यांची पंतप्रधान म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स असे म्हटले जाऊ लागले. यासाठी १९९४ साली मनमोहन सिंग यांना युरो मनीने सर्वोत्तम अर्थमंत्र्यांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले तेंव्हा त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की याचे खरे श्रेय नरसिंहराव यांना दिले गेले पाहिजे. नरसिंहराव सरकारने १९९२ सालच्या अर्थसंकल्पात परकीय गुंतवणुकीला पोषक धोरण आणले त्यामुळे शेअर बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले.

मोठ्या प्रमाणावर तोट्यात असलेल्या सरकारी संस्थांचे पुनर्जीवन करण्यासाठी खाजगीकरणाची सुरवात नरसिंहराव यांनी केली तर सेबी अर्थात सिक्युरिटी एक्सचेंज बोर्ड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजची सुरवात देखील त्यांनीच केली. देशाच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांनी खासदार निधीची सुरवात केली. सत्तेवर आल्यावर त्यांनी पंजाबमध्ये निवडणुका घेतल्या या निवडणुकीनंतर बियांत सिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. त्या सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलून राज्यात शांतता प्रस्थापित केली. पंजाबमधील दहशतवादाचे उच्चाटन करण्यामध्ये आणि फुटीरतावादी चळवळीला क्षीण करण्यामध्ये नरसिंहराव यांनी त्यांच्या खंबीर निर्धाराचे दर्शन घडवले. नरसिंहराव म्हणायचे जग बदलले आहे, देशात देखील बदल झाले पाहिजेत. आपल्या याच सिद्धांताला सोबत घेऊन भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवा आकार देत त्यांनी आग्नेय आशिआई देशांसोबत मैत्रीचा प्रारंभ लूक ईस्ट या धोरणाने केला. सत्तेवर असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने १९९८ सालच्या निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे त्यांनी राजकारणातून संन्यास घेतला. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत. २३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या पुण्यतिथी दिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी